# कोर्ट विद्यमान उपविभागीय अधिकारी भंडारा यांचे कार्यालय

क्र.सिरस्ते/उविअभं/भुसं./कलि/कावि-१३ /२०२१
उपविभागीय अधिकारी भंडारा यांचे कार्यालय
दिनांक:- ०२/०३/२०२१

## अधिसुचना
(कलम १९)

(भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३)
भु. मा. क्र. ३४ /अ-६५/२०१९-२० मौजा मोहरी त.सा.क्र. २० तालुका पवनी जिल्हा भंडारा

ज्याअर्थी समुचित शासन असलेल्या भंडारा जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्याने भुमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश उक्त अधिनियम असा केला आहे.) यांच्या कलम ११ च्या पोटकलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून अधिसुचना क्रमांक सिरस्ते/उविअभं/भुसं/कलि/कावि-७४७/२०२०, दिनांक ०७ फेब्रुवारी,२०२० अन्वये प्रारंभीक अधिसूचना काढण्यात आलेली आहे. आणि त्याद्वारे असे अधिूसचीत केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेल्या जमीनीची अनुसूचि दोन मध्ये अधिक तपशिलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी भंडारा जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटलेली आहे. आणि म्हणुन उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटूंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीतच्या प्रयोजनासाठी पुनर्वसाहत क्षेत्र म्हणुन निर्धारीत केले असल्याचे याद्वारे घोषित केले असून पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भुसंपादन अधिकारी भंडारा यांना पदनिर्देशित करीत आहे.

अनुसूचि एक
जमीनीचे वर्णन

भुसंपादन मा. क्र. ३४/अ-६५/२०१९-२०२० मौजा मोहरी त.सा.क्र. २० तालुका पवनी जिल्हा भंडारा

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक किंवा गट क्रमांक | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) हे.आर. मध्ये |
|---|---|---|
| १ | १७२ | ०.१४ |
| २ | ५० | ०.०१ |
| ३ | २९/२ | ०.०६ |

| | | |
|---|---|---|
| ४ | ११ | ०.०४ |
| ५ | १५ | ०.०१ |
| ६ | १६ | ०.०४ |
| ७ | ३१८ | ०.०२ |
| ८ | ३०० | ०.११ |
| ९ | २९९ | ०.०७ |
| **एकूण** | | **०.५०** |

## अनुसूची — दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव :- गोसीखुर्द प्रकल्प

प्रकल्पाचे वर्णन :- गोसीखुर्द डावा कालव्याचे सा. क्र. १४४०० मी. वरून निर्गमित मोहरी लघु कालवा २. धामणी लघु कालव्यावरील धामणी उपलघु कालवा ३. शाखा कालवा क्र. २ वरील विरली बु. उपलघु कालवा

समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार, पायाभुत सुविधा याबाबत व इतर लाभासंबंधात) :- गोसीखुर्द प्रकल्पाद्वारे सिंचन, पिण्यासाठी पाणी पुरवठा, औद्योगिक पाणी पुरवठा, मत्स्य व्यवसाय व जलविद्युत निर्मिती

## अनुसूची — तीन

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

--- निरंक --

## अनुसूची — चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनचा सारांश)

--- निरंक --

टिप :- उक्त जमीनीच्या आराखडयाचे भुसंपादीत जमीनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी भंडारा या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

स्थळ :- भंडारा

दिनांक :- ०९.०३.२०२१

(संदीप कदम) भा.प्र.से.

जिल्हाधिकारी भंडारा